# भाविकांनी घेतले संत ज्ञानेश्वर माऊलींच्या "पैस" खांबाचे दर्शन



**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

फाल्गुन वद्य पापमोचनी एकादशीच्या निमित्ताने नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज "पैस"खांब मंदिरामध्ये हजारो भाविकांनी माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या "पैस" खांबाचे दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी येथे "ज्ञानोबा माऊली तुकाराम"असा गजर करत हजेरी लावली होती. आलेल्या दिंडयांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी स्वागत केले. माऊलींच्या फाल्गुन वद्य पापमोचनी एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊलीच्या "पैस" खांबास अभिषेक घालण्यात आला. यावेळी मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.किशोर गळनिंबकर,डॉ.शंकरराव शिंदे,स्त्री रोग तज्ञ डॉ.मनिषा वाघ,डॉ.निर्मला सांगळे,डॉ.संदीप देशमुख,डॉ. गणेश नांदे,डॉ.निलेश लोखंडे,डॉ. वरुणराज देवरे यांच्या हस्ते माऊलींच्या पैस खांबाचे पूजन करण्यात आले.उपस्थित डॉक्टर मंडळींचा वेदांताचार्य म्हस्के शास्त्री,देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव,जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.

गंगापुर तालुक्यातील नागापूर,शेंदूरवादा येथील भजनी मंडळ तर दुपारच्या सत्रात अंमळनेर खुपटी भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला तर करजगाव व शिरगाव येथील सेवेकऱ्यांनी मंदिरात सेवा दिली.

यावेळी मध्यमेश्वर मंदिर देवस्थानचे प्रमुख बालयोगी महंत श्री ऋषिनाथजी महाराज, नेवासा पंचायत समितीचे माजी सभापती रावसाहेब कांगुणे,श्रीराम साधना आश्रमाचे सेवेकरी वैभव निकम,युवा उद्योजक शिवाभाऊ पाठक,खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचे स्वीय सहायक बाळासाहेब सोनवणे,भक्त मंडळाचे सेवेकरी विष्णूपंत ठोसर यांनी माऊलींच्या पैस खांबाचे दर्शन घेतले त्यांचा यावेळी देवस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला.

एकादशीचे औचित्य साधून माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी,संत ज्ञानेश्वर माऊली पैस खांब,भगवान दत्तात्रय,करविरेश्वर, वैकुंठवाशी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर परिसर गर्दीने गजबजून गेला होता.मंदिर परिसरात विविध दुकाने उभारण्यात आल्याने यात्रेचे स्वरूप परिसराला प्राप्त झाले होते.

एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांचे किर्तन झाले. कीर्तनाला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना विलास नांगरे यांच्या परिवाराच्या वतीने भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले.

# आंतरशालेय जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत लेजेंड अकॅडमीचे घवघवीत यश

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

नारायणगाव येथे दिनांक १५ मार्च २०२६ रोजी ग्रामोन्नती मंडळ नारायणगाव तसेच सह्याद्री स्पोर्ट फाउंडेशन नारायणगाव यांच्या वतीने आयोजित अंतरशालेय जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत शिवजन्म भूमी क्रीडा प्रतिष्ठानच्या लेजेंड अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेख नीय यश संपादन केले. या स्पर्धेत अकॅडमीच्या खेळाडूंनी विविध धावण्याच्या व उडीच्या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत ११ प्रथम, ७ द्वितीय व ३ तृतीय अशी एकूण २१ पदके पटकावली. या शानदार कामगिरीमुळे लेजेंड अकॅडमीला स्पर्धेत “रनर-अप” चषक मिळाला.अंडर-६ गटात शंभुराज डोके,आराध्या थोरात यांनी पदके मिळवली. अंडर-१० गटात ईश्वरी आनंद दुराफे,नवता वीर,शुभ्रा होगे व सानवी कबाडी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली तर अंडर-१२ गटात तनुषा नागराज शेटे,श्रीशा वाळुंज,गिरीजा डोके ईश्वरी शिंदे,रोहित गव्हाळे, शिवराज लोखंडे,श्लोक डामसे, श्रवण पुंडे,राज साखला देवराज वाघमोडे यांनी विविध स्पर्धांमध्ये पदके मिळवून अकॅडमीचे नाव उज्ज्वल केले. या सर्व खेळाडूंना शिवजन्मभूमी क्रीडा प्रतिष्ठान च्या लेजेंड अकॅडमीचे प्रशिक्षक कोच दिशांत मेहेर यांचेमार्गदर्शन लाभत असून त्यांच्या प्रशिक्षणा खाली खेळाडू सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. खेळाडूं च्या या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यां चे व पालकांचे अभिनंदन करण्यात आले.




# सेनगावचे आदर्श शिक्षक शिवलिंग साखरकर यांची उपशिक्षण अधिकारीपदी निवड!



**हिंगोली : (समर्थ गांवकरी)**

सेनगाव येथील आदर्श शिक्षक शिवलिंग अप्पा साखरकर यांची नुकतीच उपशिक्षण अधिकारीपदी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सेनगाव परिसरात आनंद व्यक्त होत आहे. शिवलिंग साखरकर हे सेनगाव शिक्षक कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन म्हणूनही कार्यरत असून शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल सेनगाव शिक्षक कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी विलास आंधळे, गजानन मुळे, मधुकर गडदे, पत्रकार केशव भालेराव यांच्यासह पतसंस्थेचे संचालक, शिक्षकवृंद व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी साखरकर यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड व श्री. गुरू गोविंदसिंघजी, शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार 17 मार्च रोजी सकाळी 10 ते 2 वा. पर्यंत श्री.गुरू गोविंदसिंघजी, शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे पंडीत दिनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह / रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा.लि छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत युवकांसाठी टोयोटाचा 'शिका आणि कमवा'उपक्रमांतर्गत जागतिक दर्जाचे निवासी तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात ऑटोमोटिव्ह वेल्ड टेक्निशियन, ऑटोमोटिव्ह पेंट टेक्निशियन, ऑटोमोटिव्ह असेंब्ली टेक्निशियन आणि मेकॅट्रॉनिक्स टेक्निशियन यासारखे कोर्सेस उपलब्ध आहेत.

# श्रीगोंद्याच्या भूमिपुत्राचा नाशिककरांकडून सन्मान

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील महत्त्वाची सहकारी संस्था असलेल्या मढेवडगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी बापूसाहेब वाबळे यांची नुकतीच दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली. त्यांच्या निवडीचा आनंद व्यक्त करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील मित्रमंडळी थेट श्रीगोंद्याला येऊन त्यांचा सन्मान केला. बापूसाहेब वाबळे यांची इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी असून त्या माध्यमातून ते राज्यातील विविध जिल्ह्यांत कृषी प्रदर्शनांचे आयोजन करतात. त्यामुळे राज्यभर त्यांचा मोठा मित्रपरिवार तयार झाला आहे. त्यांच्या निवडीची बातमी सोशल मीडियावर समजल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील त्यांच्या घनिष्ठ मित्रांनी श्रीगोंद्याला येत त्यांचा सन्मान केला. नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांच्या पुढाकाराने कारखाना परिसरात चेअरमन बापूसाहेब वाबळे व व्हॉईस चेअरमन दत्तात्रय झुंजुरुक यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. याच कार्यक्रमस्थळी नाशिकहून आलेल्या मान्यवरांनीही वाबळे यांचा सन्मान केला. या प्रसंगी नाशिक जिल्हा परिषदेचे गटनेते तसेच चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. आत्माराम कुंभार्डे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वाल्मिक वानखेडे, राजेंद्र ठाकरे, चांदवड खरेदी-विक्री संघाचे संचालक पुंडलिक गुंजाळ, रविंद्र ठाकरे, विजय कुंभार्डे, पन्हाळेचे सरपंच बाबुराव कुंभार्डे, दिगवनचे सरपंच रावसाहेब गांगुर्डे, उरदोळचे सरपंच श्रीहरी ठाकरे, जोपुळचे सरपंच दिबंबर वाघ, नारायणगावचे सरपंच सिताराम मांदळे यांसह चांदवड तालुका, जि. नाशिक येथील अनेक मान्यवर उपस्थित होते. एवढ्या दूरवरून वाबळे यांच्या सन्मानासाठी आलेल्या या मान्यवरांचे आगमन पाहून कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे, संचालक सुभाषकाका शिंदे, सरपंच प्रमोद शिंदे तसेच आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थांना विशेष आनंद झाला.

कार्यक्रमात बोलताना डॉ. आत्माराम कुंभार्डे यांनी नाशिक जिल्ह्यात वाबळे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, वाबळे यांनी चांदवड तालुक्यातील अनेकांच्या मनात आपल्या कामातून स्थान निर्माण केले आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व राजकारणात आलेले पाहून आश्चर्य वाटले, परंतु राजू दादांबद्दल असलेल्या प्रेमामुळेच ते या क्षेत्रात आले असावेत.



# शिक्षक मतदार संघ निवडणूकिसाठी प्रा. लहाने यांचे नाव चर्चेत

## *शिवसेना उबाठाकडून महाविकास आघाडीकडे दावेदारीची शक्यता*

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

शिक्षक मतदार संघाची निवडणूक जवळ येत आहे. निवडणूक जसी जवळ येत आहे तसतसे नवीन राजकीय समीकरणे देखील तयार होत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे ही निवडणूक आव्हानात्मक करण्याचा पूर्ण प्रयत्न यंदा होत आहे.सामाजिक चेहरा लाभलेल्या प्रा. डी एस लहाने यांना यासाठी गळ घातली जात असून मातोश्रीवर देखील त्यांच्या नावाची चर्चा झाल्याची माहिती आहे.लहाने स्वतः शिक्षक राहिलेत,त्यांना उमेदवारी मिळाल्यास ही निवडणूक चुरशीची व विरोधकांसाठी आव्हानात्मक ठरू शकते. पाच जिल्ह्यातील व्याप्त मतदार संघामध्ये बुलढाणा येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे )पक्षाचे सह संपर्कप्रमुख डी एस लहाने यांची देखील या मतदार संघावर सुरुवातीपासून नजर होती.



डिसेंबर २०२० मध्ये झालेली ही निवडणूक तेंव्हा चांगलीच गाजली होती. आता शिक्षण क्षेत्रातील अनेक दिग्गज भवितव्य आजमावण्यासाठी मतदार नोंदणीच्या धावपळीला लागले आहेत. या मतदारसंघासाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केला होता. डी एस लहाने यांचा शैक्षणिक क्षेत्रातील वावर आणि सामाजिक क्षेत्रातील काम मोठ आहे. सहकार क्षेत्रातून सामान्यांच्या उन्नतीसाठी देखील त्यांनी प्रयत्न चालवले आहे. महत्त्वाचे म्हणजे विधवा महिलांच्या पुनर्विवाहाची चळवळ गतिमान करून त्या दृष्टीने राज्यभर त्यांनी आपल्या कामातून नवी ओळख मिळवली आहे. लहाने यांच्यासारख्या सामाजिक चेहरा असलेल्या व्यक्तीने ही जागा लढवण्यासाठी समर्थकांकडून जोर लावल्या जात आहे. त्यातच काल-परवा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्री येथे विविध पक्षातील अनेक कार्यकर्त्यांचा शिवसेना पक्षप्रवेश घडून आला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट देखील घेतली. या भेटीत डी.एस. लहाने यांच्या अमरावती शिक्षक मतदार संघाच्या बाबत उमेदवारीवर चर्चा झाल्याचे समजते.

प्राथमिक स्वरूपात झालेल्या या चर्चेनंतर आगामी काळात डी एस लहाने यांची उमेदवार म्हणून एन्ट्री झाल्यास राजकीय समीकरण बदलतील हे सांगण्याची गरज नाही. स्वच्छ प्रतिमा, स्वतः शिक्षक असल्याने शिक्षकांच्या समस्यांची चांगली जाणीव, समाजकारणाची विशेष आवड व निवडणुकीसाठी लागणारे अर्थकारण या सर्वच बाबींमध्ये प्रा. लहाने फिट बसतात. त्यामुळे लहाने उमेदवार राहील्यास निवडणूक चुरशीची ठरू शकते.

# १६ ते १९ मार्च या चार दिवसांसाठी यलो अलर्ट जारी

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी 16 मार्च रोजी सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी 16 व 19 मार्च 2026 या दोन दिवसांसाठी यलो (Yellow) अलर्ट जारी केलेला आहे. 16 व 17 मार्च हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 30 ते 40 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा व 18 ते 19 मार्च 2026 हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी 40 ते 50 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटावसह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# कामिनी देविकरची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी निवड




**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

भोपाळ येथे झालेल्या दक्षिण/पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाची खेळाडू कामिनी देविकर हिने 63 ते 70 किलो वजनगटात उल्लेखनीय कामगिरी करत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. ही स्पर्धा चंदीगड येथे होणार आहे.

कामिनी देविकर हिचे वडील पंढरीनाथ देविकर व आई सौ. सविता देविकर यांनी ज्युदोसारख्या आव्हानात्मक क्रीडा प्रकारात मुलीला प्रोत्साहन देत तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

कामिनीच्या या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुलदादा जगताप, विकास समिती सदस्य बाबासाहेब भोस, महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. रमेश थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. रत्नाकर झिटे, डॉ. राहुल गायकवाड, अधीक्षक बाळासाहेब राऊत तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तिला शारीरिक शिक्षण संचालिका कल्पना बागुल, क्रीडा शिक्षक संजय डफळ तसेच इंटरनॅशनल कुस्ती संकुल, श्रीगोंदा येथील श्री. हनुमंत फंड यांचे मार्गदर्शन लाभले.

# गटनेतेपदी राष्ट्रवादी (श.प.) अभिजीत पवार यांची निवड

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या सुचनेनुसार तथा जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या शिफारशीवरून राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या ठाणे महानगर पालिकेतील गटनेतेपदी नगरसेवक अभिजीत पवार यांची निवड करण्यात आली आहे. ठाणे महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर अश्रफ शानू पठाण यांची ठाणे महानगर पालिकेत गटनेतेपदी निवड करण्यात आली होती. मात्र, नुकत्याच झालेल्या महासभेत शानू पठाण यांची विरोधी पक्ष नेतेपदी निवड केल्याने रिक्त झालेल्या गटनेतेपदावर अभिजीत पवार यांची निवड करण्यात आली आहे. अभिजीत पवार हे प्रभाग क्रमांक 9 मधून विजयी झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे तथा डॉ.जितेंद्र आव्हाड यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. या निवडीनंतर बोलताना, "डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या आदेशाने तसेच मनोज प्रधान यांच्या शिफारशीनुसार आपली गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाची सर्वसमावेशक भूमिका मांडण्यास आपण प्राधान्य देणार असून पक्षाच्या नगरसेवकांना एकसंघ ठेवण्यासाठी आपण काम करणार आहोत, असे अभिजीत पवार यांनी सांगितले.



# ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीला प्रशासकीय सुविधा मिळाव्यात

## नियोजन बैठकीत एकमुखी मागणी

**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पायी पालखी सोहळा २०२६ श्रीक्षेत्र नेवासा ते श्रीक्षेत्र पंढरपूर दिंडीच्या पार्श्वभूमीवर नुकतीच पूर्व नियोजन बैठक नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या सभागृहात पालखी दिंडीचे प्रमुख मार्गदर्शक हभप वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली सदर बैठकीत माऊलींची कर्मभूमी असलेल्या नेवासा येथून निघणाऱ्या पायी पालखी दिंडीला शासनाकडून प्रशासकीय सुविधा मिळाव्यात अशी एक मुखी मागणी वारकऱ्यांकडून यावेळी करण्यात आली. झालेल्या नियोजन बैठकीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख विश्वस्त व मार्गदर्शक महंत वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के,गंगापूर येथील विठ्ठल आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य ह.भ.प. रामभाऊजी महाराज राऊत,ह भ प सुदामदेव महाराज आदमाने, राजाराम महाराज तूवर, प्रवीण महाराज कोरडगावकर, ह.भ.प.श्रीराम महाराज झिंजुर्के आखेगावकर,आदिनाथ महाराज भोगे,नंदकिशोर महाराज खरात,श्रीहरी महाराज वाघचौरे,श्रीराम महाराज चोपडे प्रमुख उपस्थितीत होते

शासनाच्या दृष्टीने मानाच्या सोहळयासाठी शिस्त, स्वच्छता यासह काही निकष आहेत ते सर्व निकष या माऊलींच्या दिंडी सोहळयामध्ये असल्याने हजारो वारकऱ्यांचा समावेश असलेल्या माऊलींच्या या दिंडीला सुरक्षासह,फिरते शौचालये,आरोग्य सुविधा शासनाने पुरवावीत अशी मागणी यावेळी सर्व महाराज मंडळींच्या वतीने करण्यात आली.



गाथामूर्ती हभप रामभाऊ महाराज राऊत बाबांनी माऊलींच्या निघणाऱ्या या दिंडीसाठी शासकीय सुविधा उपलब्ध कराव्यात अशी अपेक्षा व्यक्त करत वारकऱ्यांनी शिस्तीचे पालन करत या दिंडी सोहळयाचे वैभव कसे वाढेल यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन यावेळी बोलतांना केले.

त्याच बरोबर मागील वर्षी नेवासा येथून निघणाऱ्या ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पायी पालखी दिंडीमध्ये एकूण वीस दिंड्यासह पंधरा हजार वारकरी सहभागी झाले होते त्यानुसार शासनाने या दिंडीला सवलती द्याव्यात या मागणीसह मागील वर्षी न आलेल्या इतर दिंड्यांनी माऊलींच्या दिंडीत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणीद्वारे आवाहन करण्यात आले.

सदर दिंडी ही संत ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमीतील दिंडी असल्याने शासनाने या दिंडीकडे पहावे व इतर दिंडीप्रमाणे दिंडीस सुविधा देण्यासाठी प्रयत्न करावा कारण याच भूमीतून माऊलींनी विश्वाला न्हाऊ घालणारे शब्द ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून प्रकट केले येथून निर्माण झालेले पसायदान ही विश्व प्रार्थना असल्याने माऊलींच्या या कर्मभूमीच्या दिंडीला शासनाने अधिकाधिक सुविधा देण्याचा विचार करावा अशी ही अपेक्षा अनेक महाराज मंडळींनी आपल्या भाषणातून बोलून दाखवली

सदर बैठकीला नेवासा तालुक्यातील महाराज मंडळी, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,खजिनदार ज्ञानेश्वर माऊली शिंदे,विश्वस्त कैलासभाऊ जाधव, कृष्णाभाऊ पिसोटे यांच्यासह वारकरी दिंडी चालक-मालक नेवासा नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जामखेडमध्ये ‘उडान’ अभियानाची बालविवाह प्रतिबंध कार्यशाळा

## अंगणवाडी सेविकांनी केला गाव बालविवाह मुक्ततेचा निर्धार

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

बालविवाह ही एक सामाजिक समस्या असून तिच्या निर्मूलनासाठी प्रशासकीय यंत्रणा आणि सामाजिक संस्थांनी सामूहिक लढा देणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन मान्यवरांनी जामखेड येथे आयोजित बालविवाह प्रतिबंध कार्यशाळेत केले.स्नेहालय उडान बालविवाह प्रसतिबंधक अभियान,जिल्हा महिला व बालविकास विभाग,जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि बालविकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने ‘उडान बालविवाह प्रतिबंध अभियाना’अंतर्गत या विशेष जाणीव जागृती कार्यशाळेचे आयोजन महावीर मंगल कार्यालय जामखेड येथे करण्यात आले होते.यावेळी विचार मंचावर बालविकास प्रकल्प अधिकारी हिरा सानप,चाईल्ड लाईन केंद्र समन्वयक महेश सूर्यवंशी,स्नेहालय उडान प्रकल्पाचे समन्वयक योगेश अब्दुले,महिला सक्षमीकरण केंद्राच्या पूजा ढेरे,विपला फाउंडेशनच्या ॲड. शुभांगी रोहकले,पर्यवेक्षिका आर.एस.जावळे,व्ही.पी.वाघमारे,

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सावित्रा कदम,राहुल कांबळे आदी उपस्थित होते.

यावेळी स्नेहालय उडान अभियानाचे समन्वयक योगेश अब्दुले म्हणाले की;बालविवाह या समस्याचे निर्मलानासाठी स्नेहालय उडान प्रकल्प अंतर्गत वाड्या वस्त्यांवर,गाव आणि शहरी भाग,शाळा-महाविद्यालय,युवक युवती,प्रत्येक नागरिक आणि प्रशासनासोबत बालविवाह जाणीव जागृतीचे काम सक्रिय सकारात्मक भूमिकेतून करत आहे.अहिल्यानगर जिल्हा २०२७ पूर्वी बालविवाह मुक्ततेसाठी उडान प्रकल्पाचे प्रयत्न,ध्येय आणि कार्यपद्धती स्पष्ट केली.बालविवाहाचे दुष्परिणाम मांडतानाच बालकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संस्थात्मक पातळीवर केल्या जाणाऱ्या कामांची माहिती देत बालविवाह होण्याचे कारणे,त्यावरील उपाययोजना,माझे गाव बालविवाह मुक्त गाव ही संकल्पना व बालकांचे प्रश्न आणि बाल संरक्षणासाठी कटिबद्ध आहे असे ते म्हणाले.



जिल्हा महिला व बाल विकास विभागाचे महेश सूर्यवंशी म्हणाले की;काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी तत्परतेने यंत्रणांनी सजगकता दाखविली पाहिजे.जिल्हा महिला व बालविकास विभागा अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध शासकीय योजनांचा आढावा घेत बालविवाह थांबविण्यासाठी स्थानिक पातळीवरील प्रतिबंत्मक उपाययोजनांवर त्यांनी भर दिला. आणि बालविवाह रोखण्यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी गरजेची आहे असे ते म्हणाले.

यावेळी महिला सक्षमीकरण केंद्राच्या पूजा ढेरे म्हणाल्या की;महिलांचे हक्क आणि त्यांच्या विकासाशी संबंधित प्रश्नांवर उपाययोजना होणे आवश्यक आहे. जाचक रूढी परंपरेला फाटा देत मुलगा मुलगी भेद टाळून महिला सक्षमीकारणासाठी स्त्री स्वातंत्र्य गरजेचे आहे.असे परखड मतही त्यांनी व्यक्त केले.शासनामार्फत महिलांच्या उन्नतीसाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

यावेळी विपला फाउंडेशनच्या ॲड.शुभांगी रोहकले म्हणाल्या की;बालविवाह हा सामाजिक प्रश्न पुन्हा निर्माण झाला आहे. यातून अनेक पातळीवर मुली महिलांचा छळ होत आहे.दाद कुठे आणि कोणाला मागायची यावर समाज मात्र गप्प आहे.हा अबोला समाजाला अनेक पिढ्या मागे घेऊन जाणारा आहे.कौटुंबिक हिंसाचार कायद्या,बालकांना तातडीने संरक्षणाची गरज आणि त्यांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण कसे करावे आणि बालविवाहतून निर्माण होणारा कौटुंबिक हिंसाचार रोखुया असे परखड भाष्यही त्यांनी केले.

यावेळी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सावित्रा कदम म्हणाल्या की;बालविवाहामुळे बालकांचे शारीरिक,मानसिक वाढ खुंटून अनेक प्रश्न आणि समस्या उभ्या राहिल्या आहेत. बालविवाहामुळे सकस आणि संतुलित आहार किशोरवयीन मुला-मुलींच्या शारीरिक विकासासाठी पोषणाची गरज असे त्या म्हणाल्या.या कार्यशाळेच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकारी,२२५ अंगणवाडी सेविका आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी बालविवाह मुक्त समाज घडवण्याचा निर्धार व्यक्त केला.या मोहिमेत सर्व स्तरातील नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून बालविवाहाची माहिती मिळाल्यास त्वरित प्रशासनाला कळवावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी योगेश अब्दुले,राहुल कांबळे,आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रवरा माध्यमिक विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची सभा



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

प्रवरा माध्यमिक विद्यालय, भुतेटाकळी येथे माजी विद्यार्थी संघाची या शैक्षणिक वर्षातील दुसरी सभा संपन्न झाली.सभेचे अध्यक्ष फुंदे रामनाथ, कोषागार फुंदे दीपक, सदस्य पंढरीनाथ फुंदे गुरुजी, गोडगे बंडोपंत, फुंदे वाल्मिक, शाळा समिती अध्यक्ष कुमारभाऊ फुंदे उपस्थित होते. पदमश्री च्या प्रतिमेचे पूजन झाले.या संघांचे सेक्रेटरी मुख्याध्यापक पठाण आसिफ यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयास कंपाऊंड वॉल साठी केलेल्या भरीव मदतीसाठी आभार मानले. व संपूर्ण जमा खर्च दाखवला व अशीच मदत भविष्यात ही वेळोवेळी करण्यासाठी विनंती केली. या प्रसंगी शैक्षणिक प्रगती, करिअर मार्गदर्शन, सुमूपदेशन, स्पर्धा परीक्षा, आर्थिक पारदर्शकता इत्यादी वर पोषक चर्चा झाली.

सूत्रसंचालन टाकळकर अजिनाथ, आभार फुंदे बाळासाहेब यांनी मानले. खुडे लक्ष्मण, भगत अशोक,फुंदे रामकिसन, गोडगे पद्मावती उपस्थित होते. माजी विद्यार्थी संघाने समाधान व्यक्त करून अशीच मदत करीत राहण्याचे आश्वासन दिले.

# तापमानाचा पारा घसरला

**डांग, गुजरात : (समर्थ गांवकरी)**

दक्षिण गुजरातमधील डांग जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या कडक उन्हानंतर आता हवामानात मोठा बदल दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी बघई आणि जिल्हा मुख्यालय आहवा परिसरात तापमानाचा पारा ४३ अंशांवर गेल्याने नागरिक हैराण झाले होते. मात्र सध्या तापमानात लक्षणीय घट झाल्याने संपूर्ण परिसरात गारवा पसरला आहे. ताज्या माहितीनुसार वघई येथे तापमान ३७ अंशांपर्यंत खाली आले असून आहवा येथे ३५ अंश तापमान नोंदवले गेले आहे. विशेष म्हणजे हिल स्टेशन सापुतारा येथे तापमान थेट २८ अंशांवर आल्याने पर्यटक आणि स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.याशिवाय सुबिर परिसरातही ३१ अंश तापमान नोंदवले गेले असून उकाड्यातून मोठा दिलासा मिळाला आहे.

# संत निरंकारी मिशनद्वारा आयोजित रक्तदान शिबिरात ७८ जणांनी केले रक्तदान

**घोडेगाव (पुणे) : (समर्थ गांवकरी)**

आध्यात्मिकताच मानवी एकता मजबूत करू शकते आणि माणसांना एकमेकांच्या जवळ आणून परस्पर प्रेम आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण करू शकते. त्याच हेतूने निरंकारी 'सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज' यांच्या कृपाशीर्वादाने चिंचोली (ता आंबेगाव,पुणे) येथे संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारा विशाल रक्तदान शिबिराचे आयोजन रविवार, 15 मार्च 2026 रोजी करण्यात आले होते. ज्यामध्ये मिशनचे अनुयायी आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन 78 युनिट रक्त संकलन वाय सी एम रुग्णालय रक्तपेढीला देण्यात आले.

संत निरंकारी मिशनद्वारे निरंकारी बाबा हरदेव सिंहजी महाराज यांनी मानवतेला संदेश दिला होता कि 'रक्त नाल्यांमध्ये नाही, तर ते नाड्यांमध्ये वाहिले पाहिजे' म्हूनन संत निरंकारी मिशनच्या अनुयायांनी हा संदेश निश्चितपणे अमलात आणला असून आज वर्तमान काळात निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या निर्देशानुसार निरंतर हा पुढे नेला जात आहे.





संत निरंकारी मिशन तर्फे घोडेगाव परिसरामध्ये मानवतेच्या कल्याणार्थ वेळो-वेळी अनेक जनसेवेचे उपक्रम आयोजीत करण्यात येतात, ज्यामध्ये मुख्यतः स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आयोजन केले जाते. यासारख्या सर्व सामाजिक कार्यासाठी भारत सरकार तसेच राज्य सरकारांद्वारे मिशनला वेळोवेळी सन्मानित करण्यात आले आहे.

रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी संत निरंकारी सेवादल, मिशनचे अनुयायी यांचे विशेष योगदान लाभले. दरम्यान रक्तदान जागृती जनसामान्यांमध्ये व्हावी यासाठी घोडेगाव परिसरात घरोघरी जाऊन रक्तदानाचा संदेश देखील पोहोचविण्यात आला. या शिबीराचे उद्घाटन/शुभारंभ चिंचोलीचे मा सरपंच तथा विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन मा श्री विलास आप्पा कोकणे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराला आंबेगाव तालुका पंचायत समितीचे सभापती मा श्री कैलास बुवा काळे पाटील, आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक मा श्री दत्ताभाऊ कोकणे पाटील सह अनेक प्रतिष्टीत व्यक्ती, मान्यवर, पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते यांनी देखील या शिबिरास सदिच्छा भेट दिली. अनेक संत निरंकारी मिशनचे अनुयायी आवर्जून उपस्थित होते शेवटी आलेल्या सर्व रक्तदात्यांचे व मान्यवरांचे आभार घोडेगाव शाखेचे प्रमुख श्री अजित महाराज कोकणे यांनी मानले.

# जव्हारमध्ये श्रमजीवी संघटनेचा एल्गार

- आदिवासी-कातकरी महिलांसाठी मोफत सॅनिटरी नॅपकिनची मागणी
- योजनेसाठी निधी उपलब्ध करून तातडीने शासन निर्णय काढण्याची मागणी



**पालघर : (समर्थ गांवकरी)**

ठाणे व पालघर जिल्ह्यातील गरीब आदिवासी व कातकरी समाजातील मजूर महिलांना मासिक पाळीच्या काळात आरोग्यदायी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी श्रमजीवी संघटनेच्या वतीने जव्हार तहसील कार्यालयात निवेदन देत मोफत सॅनिटरी नॅपकिन योजना सुरू करण्याची मागणी करण्यात आली. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून तातडीने शासन निर्णय काढावा, अशीही मागणी संघटनेने केली आहे. ठाणे व पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आदिवासी व कातकरी समाजातील महिला मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने अनेक महिलांना मासिक पाळीच्या काळात आवश्यक असलेले सॅनिटरी नॅपकिन खरेदी करणे शक्य होत नसल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. परिणामी अनेक महिलांना अस्वच्छ कापड किंवा इतर अपुऱ्या साधनांचा वापर करावा लागतो. यामुळे संसर्गजन्य आजार, त्वचारोग, गर्भाशयाशी संबंधित विकार तसेच इतर गंभीर आरोग्य समस्यांचा धोका वाढत असल्याचेही संघटनेने स्पष्ट केले. मासिक पाळी हा महिलांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत नैसर्गिक आणि महत्त्वाचा विषय असून या काळात स्वच्छता राखणे आवश्यक आहे. मात्र ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांना स्वच्छता आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याची खंत संघटनेने व्यक्त केली. त्यामुळे शासनामार्फत गरीब कुटुंबांना ज्या पद्धतीने धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या जातात, त्याच धर्तीवर ग्रामपंचायत स्तरावर अंगणवाडी सेविका, आशा वर्कर किंवा रेशनिंग दुकानांच्या माध्यमातून गरीब आदिवासी व कातकरी महिलांना दरमहा मोफत सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देण्याची योजना सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक मुलगी व महिलेला दरमहा किमान १२ सॅनिटरी नॅपकिन मोफत देण्यात यावेत तसेच मासिक पाळी स्वच्छतेबाबत ग्रामीण व आदिवासी भागात जनजागृती मोहीम राबवावी, अशीही मागणी संघटनेने केली. दरम्यान, या मागण्यांसाठी श्रमजीवी संघटनेच्या वतीने आज जव्हार तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अजित गायकवाड, सचिव संतोष दिंडा, संघटक सचिव सीता घाटाळ, ॲड. पूजा सुरम-माळी, पालघर जिल्हा महिला प्रमुख रेखा पऱ्हाड, ठाणे जिल्हा महिला प्रमुख जया पारधी, तालुका महिला प्रमुख यमुना भोये, तालुका महिला सचिव तुळसा कोंगिल, तालुका महिला उपाध्यक्ष लीला रोज, गोविंद गावित, अंकुश वड, विजय भुसारा, सुनील हिरकुडा, भास्कर जाबर, परशुराम गांगोडा यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऊसाने भरलेला टेम्पो पलटी

**डांग, गुजरात : (समर्थ गांवकरी)**

दक्षिण गुजरातमधील डांग जिल्ह्यात सापुतारा ते बघई यांना जोडणाऱ्या आंतरराज्यीय घाटमार्गावर बोरिगावठा (चिखली) फाट्याजवळ आज गंभीर अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक येथून ऊसाचा माल भरून सुरत कडे निघालेला आयशर टेम्पो अचानक रस्त्याच्या कडेला पलटी झाल्याने हा अपघात झाला. अपघातानंतर टेम्पोमध्ये भरलेला ऊस रस्त्यावर विखुरला गेला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र या अपघातात चालक आणि क्लिनर यांचा चमत्कारिकरित्या बचाव झाल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मदत केली. या अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता.

# पळशी झाशी तिर्थ स्थळाला दोन कोटी रुपये मंजुर

*संस्थांच्या वतीने करण्यात आला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा सत्कार*

**बुलडाणा : (समर्थ गांवकरी)**

पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील पळशी झाशी या तीर्थस्थळाला दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे संस्थांच्या वतीने केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा सत्कार नुकताच सत्कार करण्यात आला . बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातर्गत येणारे पळशी झाशी शंकरगिरी महाराज संस्थांन हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे . या संस्थांला सरकारच्यावतीने ब दर्जा तीर्थस्थळाचा दर्जाही देण्यात आला आहे.

तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत दोन कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव व या विधानसभा मतदारसंघाचे



आमदार संजय कुटे यांच्या वतीने या संस्थांना निधी मिळावा यासाठी पाठपुरावा करण्यात आला होता. या पाठपुराव्याला यश आले असून 13 मार्च रोजी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाला आहे त्यामुळे या तीर्थस्थळाच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे या निधी अंतर्गत भव्य सभागृह प्रसादालय इतर विकसित कामे केल्या जाणार आहे दिलेला शब्द पाळला आणि भरीव अशी मदत पळशी झाशी संस्थांना केल्याबद्दल संस्थांचे विश्वस्त अरुण पाटील मोरोडे यांनी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेऊन सत्कार केला.

# मदरसन नामांकित कंपनीत सह्याद्रीच्या ३८ विद्यार्थ्यांची निवड



**राजुरी : (समर्थ गांवकरी)**

सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी राजुरी ता. जुन्नर येथील डिप्लोमा आणि आयटीआय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये ‘मदरसन’ या रांजणगाव एमआयडीसी मधील नामांकित कंपनीमध्ये ३८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. महारिया चारिटेबल ट्रस्टचे खजिनदार सचिन चव्हाण आणि अकॅडमिक डीन पी. बालारामडू यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख मुरलीधर कुरकुटे यांनी या सर्व कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन केले या मुलांच्या यशाची माहिती अतिशय अभिमानास्पद असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळालेल्या या मोठ्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने आनंद व्यक्त करण्यात येत आहे.


# राहुरी विधानसभा पोटनिवडणूक : मतदारसंघाच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू

## २३ एप्रिल रोजी मतदान तर ४ मे रोजी मतमोजणी – जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

- आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यासाठी विविध पथके स्थापन
- निवडणुकीच्या कामासाठी २३ समन्वय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

भारत निवडणूक आयोगाने २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची घोषणा केली असून मतदारसंघाच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान प्रक्रिया



पार पडणार असून ४ मे २०२६ रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके, उपजिल्हाधिकारी पुनर्वसन वर्षा पवार, तहसीलदार श्वेता संचेती, नायब तहसीलदार विशाल सदनापूर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, या पोटनिवडणुकीसाठी तात्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून निवडणुकीसाठीची अधिसूचना ३० मार्च २०२६ रोजी जारी होणार आहे.

नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ६ एप्रिल २०२६ आहे. नामनिर्देशन पत्रांची छाननी ७ एप्रिल रोजी होईल, तर उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल आहे. मतदान २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून मतमोजणी ४ मे रोजी केली जाईल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे २०२६ पूर्वी पूर्ण करणे बंधनकारक आहे. या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती वर्षा पवार यांची नियुक्ती करण्यात आली असून सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राहुरीचे तहसीलदार अमित पवार काम पाहणार आहेत. नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचे ठिकाण राहुरी तहसील कार्यालय परिसरातील जुने सेतू कार्यालय येथे निश्चित करण्यात आले आहे.

मतमोजणीचे ठिकाण लोकनेते रामदास पाटील धुमाळ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, राहुरी येथे राहणार असल्याची माहितीही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिली.

या पोटनिवडणुकीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनामत रक्कम १० हजार रुपये तर अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गासाठी ५ हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे. उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा ४० लाख रुपये राहील.

मतदान प्रक्रियेसाठी एकूण ५९८ बॅलेट युनिट, ६१४ कंट्रोल युनिट आणि ६०६ व्हीव्हीपॅट यंत्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व यंत्रांची प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण झाली असून मतदारांना मतदानाची खात्री व्हावी यासाठी सर्व ईव्हीएमसोबत व्हीव्हीपॅट यंत्र जोडण्यात येणार आहे.

मतदारसंघात एकूण ३७४ मतदान केंद्रे असून १५ मार्च २०२६ च्या मतदार यादीनुसार एकूण ३ लाख ३३ हजार १८३ मतदार आहेत. त्यापैकी १ लाख ७२ हजार ८५ पुरुष, १ लाख ६१ हजार ९७ महिला आणि ०१ इतर मतदार आहे. तसेच १ हजार ५२ सैनिक मतदार आहेत.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्यासाठी जिल्ह्यात विविध पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. यामध्ये ६ एफएसटी , ६ एसएसटी, ३ व्हीएसटी आणि १ व्हीव्हीटी पथके २४ तास (24 X 7) कार्यरत राहतील. विनापरवाना खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्तेवर पोस्टर्स लावणे, घोषणा लिहिणे, निवडणूक चिन्हे लिहिणे, कापडी बॅनर अथवा फलक, झेंडे लावणे व इतर कारणाने मालमत्ता विरूपित करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

नागरिकांच्या सोईसाठी जिल्हा संपर्क केंद्रात १९५० हा टोल- फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून निवडणूक कालावधीत हे केंद्र २४x७ सुरू राहणार आहे.

# पोलीसांनी संवेदनशीलता दाखवली तर अत्याचार व छेडछाड रोखता येतील

## जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा हा संवेदनशील जिल्हा म्हणून ओळखला जात असून गुन्हेगारी व अत्याचाराच्या घटना सातत्याने घडत आहेत. विशेषतः बालकांवरील अत्याचाराच्या घटना कमी होताना दिसत नाहीत. पोलिसांनी अधिक संवेदनशीलता दाखवून वेळेवर हस्तक्षेप केला तर मुलींवरील अत्याचार व छेडछाडीचे गुन्हे वेळीच रोखता येऊ शकतात, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले.

स्नेहालय व जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पोलीस दीदी प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी पोपट धामणे, स्नेहालयचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, युवानिर्माण प्रकल्पाचे संचालक डॉ. विनय कोपरकर, स्नेहाधार प्रकल्पाचे संचालक अॅड. श्याम आसावा, भरोसा सेलच्या पोलीस निरीक्षक प्रियंका आठरे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना घार्गे म्हणाले की, शाळकरी मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी 'पोलीस दीदी' सारखे उपक्रम जिल्ह्यात व्यापक प्रमाणात राबविण्याची गरज आहे. मुलींचा पाठलाग, छेडछाड यासारख्या घटनांची गंभीर दखल घेतली तर संभाव्य गुन्हे टाळता येऊ शकतात. बंदोबस्त किंवा





गुन्ह्याच्या तपासाइतकेच अशा प्रकरणात वेळीच हस्तक्षेप करणे पोलिसांसाठी अत्यंत गरजेचे आहे. शिक्षक, मुख्याध्यापक, पालक व विद्यार्थिनींना विश्वासात घेऊन पोलीस दीदींनी काम केले तर लैंगिक अत्याचाराचे गुन्हे निश्चितच कमी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अॅड. श्याम आसावा यांनी पोलीस दीदी संकल्पना व बालकांबाबतच्या कायद्यांबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेसाठी पोलीस दीदी या संरक्षक, मित्र आणि मार्गदर्शक म्हणून काम करतील. वेळेवर मदत न मिळाल्यास समस्या मुलांच्या भविष्यास कायमचे नुकसान पोहोचवू शकतात, अशा परिस्थितीत पोलीस दीदी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे त्यांनी सांगितले. डॉ. विनय कोपरकर यांनी बालकांशी संवाद साधताना विविध माध्यमांचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन केले. खुले प्रश्न विचारल्यास मुले अधिक बोलकी होतात व त्यांच्या विचारधारेत सकारात्मक बदल घडविण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. प्राजक्ता कुलकर्णी यांनी संकट व आघातग्रस्त मुलांशी संवाद व समुपदेशन या विषयावर मार्गदर्शन करताना मुलांचा विश्वास जिंकणे, त्यांना सुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण करणे, सोपी व मैत्रीपूर्ण भाषा वापरणे आणि त्यांच्या भावनांना मान्यता देणे आवश्यक असल्याचे सांगितले. मुलांनी सांगितलेल्या गोष्टींची गोपनीयता जपणे व शिक्षक-समुपदेशकांशी समन्वय ठेवणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. तेजस्विनी मिस्कीन यांनी बालकांच्या मानसिक व भावनिक स्थितीबाबत माहिती देत भीती, अस्वस्थता, एकटेपणा, लाज यांसारख्या भावनिक स्थिती तसेच राग, चिंता व वर्तणुकीतील बदल याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या घोरपडे यांनी केले तर आभार संतोष धर्माधिकारी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिद्धार्थ दाभाडे, रुपाली सोयम, मंदाकिनी मोकळ, विकास सुतार, प्रविण कदम, विनायक महाले, प्रियंका कोंगळ, सागर भिंगारदिवे, देव मोदी, आयुषा जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## ठाण्यात धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानचा चैत्र नवरात्रोत्सव होणार धुमधडाक्यात

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आयोजित कोपरी येथील चैत्र नवरीत्रोत्सव यंदा धुमधडाक्यात साजरा होणार आहे. या उत्सवाच्या निमित्ताने स्वराज्याचे आख्यान, अभंग रिपोस्ट, माता की चौकी यासह अनेक दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर, वंदना गुप्ते, निर्मिती सावंत, बिग बॉस फेम जान्हवी किल्लेकर, पुन्हा शिवाजीराजे भोसले फेम अभिनेता सिद्धार्थ बोडके, राष्ट्रीय बाल गायक पुरस्कार विजेती त्रिशा ठोसर आदी नामवंत कलाकार या उत्सवाला हजेरी लावणार आहेत, अशी माहिती आज एका पत्रकार परिषदेत खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. पत्रकार परिषदेला महापौर शर्मिला



पिंपळोलकर, नगरसेविका मालती पाटील, नम्रता पमनानी, नगरसेवक अनिल भोर, प्रकाश कोटवानी, हेमंत पमनानी, ऋषिकेश माने, संतोष बोडके, प्रकाश पाटील, शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी कार्यकर्त्या उपस्थित होत्या. संत तुकाराम क्रीडांगण, कोपरी कॉलनी पूर्व याठिकाणी या भव्यदिव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दिनांक १८ मार्च रोजी सायंकाळी देवीचे आगमन होणार असून १९ मार्चला गुढी पाडव्याच्या दिवशी दुपारी १२.१५ वाजता राज्याचे उप मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते श्री. एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते वाजत गाजत देवीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. तर रात्री ७.३० वाजता प्रसिद्ध गायिका धनश्री देशपांडे, केतकी भावे-जोशी, केतकी चैतन्य यांचा उदे ग अंबे उदे हा देवीचा जागर कार्यक्रम सादर होणार आहे. स्मिता गवाणकर या कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत.

## घरगुती गॅसचा काळाबाजार उघड

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरची अवैध साठवणूक करून चढ्या दराने विक्री करणाऱ्यांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्हा पुरवठा विभागाने श्रीनगर भागात धाड टाकून 10 रिकामे गॅस सिलिंडर जप्त केले असून संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हनुमान मंदिर रोड, श्रीनगर परिसरात राहणारे मकसूद अहमद हे आपल्या राहत्या घरी घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरचा अवैध साठा करून चढ्या दराने विक्री करत असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड व तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने 12 मार्च 2026रोजी संबंधित ठिकाणी आकस्मिक तपासणी केली.

## अॅड. एम.एन. देशमुख महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे अॅड्.एम.एन.देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत दि .१३ व १४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या राष्ट्रीय सेमिनार चे उद्घाटन बेळगाव (कर्नाटक )येथील शासकीय महाविद्यालयातील वाणिज्य शाखा प्रमुख डॉ.विद्या जिरागे, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानचे ( रुसा) माजी सदस्य व कन्सल्टंट डॉ.प्रमोद पाब्रेकर,

सत्यनिकेत संस्थेचे संचालक एस.टी.येलमामे यांचे शुभहस्ते दीप प्रज्वलन करून झाले.या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.टी. येलमामे हे होते.या कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.भाऊसाहेब देशमुख यांनी प्रास्ताविक करून प्रमुख



मान्यवरांचा परिचय करून दिला. तसेच राष्ट्रीय सेमिनार आयोजना मागील हेतू स्पष्ट केला. यावेळी संशोधन पेपर अंकाचे अनावरण प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले." उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास " या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी साधन व्यक्ती म्हणून डॉ.विद्या जिरागे (बेळगाव, कर्नाटक), डॉ.प्रमोद पाब्रेकर,(वरिष्ठ सल्लागार, रूसा,महाराष्ट्र राज्य) डॉ.अशोक पवार (डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर)डॉ. सोमनाथ गंडाळ( केंद्रीय शासकीय विद्यापीठ राजस्थान), डॉ.बाळासाहेब सराटे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर,मराठवाडा,विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) डॉ.बापू थोरात (छत्रपतीसंभाजीनगर), अजय देशमुख ( महाराष्ट्र विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघटना अध्यक्ष, अमरावती) आदी मान्यवर उपस्थित होते.

साधन व्यक्तींनी आपल्या भाषणात उच्च शिक्षणात संशोधनाची गरज आणि सातत्य तसेच आधुनिक शिक्षण पद्धती व आव्हाने यावर प्रकाश टाकून बहुमोल मार्गदर्शन केले तसेच उच्च शिक्षण व शाश्वत विकास या संबंधित विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या राष्ट्रीय सेमिनार मध्ये विविध राज्य व विद्यापीठांमधून जवळपास १०० पेक्षा अधिक संशोधक व पदयूतर विद्यार्थी, प्राध्यापक,शिक्षण तज्ञ उपस्थित होते.सहभागी प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी या सेमिनार मध्ये आपले शोधनिबंध सादर केले.

दिनांक १४ मार्च २०२६ रोजी या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप संगमनेर महाविद्यालय संगमनेरचे माजी प्राचार्य डॉ.के. के.देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत व सत्यनिकेत संस्थेचे संचालक व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीरामशेठ पन्हाळे,व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.भाऊसाहेब देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला." येथील एम.एन. देशमुख महाविद्यालय हे उच्च शिक्षण आणि शाश्वत विकासाचे खरे उदाहरण आहे " असे विचार प्राचार्य डॉ.के. के.देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले.

## विकासाच्या वाटचालीत आणखी एक पाऊल

### आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील क्रीडाप्रेमी युवकांसाठी मोठी आनंदाची बातमी समोर आली असून तालुक्यात आधुनिक सुविधांनी युक्त क्रीडा संकुल उभारण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रयत्नांमुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या क्रीडा संकुलासाठी सुमारे ३०२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुर्वी १०० लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून आता ४ कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याची माहिती आ. दाते यांनी दिली.

याबाबत बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, "पारनेर तालुक्यातील युवकांमध्ये क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळविण्याची प्रचंड क्षमता आहे. मात्र योग्य सुविधा आणि प्रशिक्षणाच्या अभावामुळे अनेक खेळाडूंना पुढे जाण्याची संधी मिळत नव्हती. त्यामुळे क्रीडा समिती तयार झाल्याबरोबर लगेच तालुक्यात असलेल्या क्रीडा संकुलाचे आधुनिकीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मांडला होता. शासनाने त्यास मान्यता दिल्याने तालुक्यातील युवकांसाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या क्रीडा संकुलामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळून भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर पारनेर तालुक्याचे नाव उज्ज्वल करणारे खेळाडू घडतील, असा विश्वास आहे." आ. दाते म्हणाले, "क्रीडा क्षेत्राला चालना देणे ही काळाची गरज आहे. युवकांना क्रीडा आणि आरोग्यदायी जीवनशैलीकडे वळविण्यासाठी अशा सुविधा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. पारनेर तालुक्यात क्रीडा विकासासाठी पुढील काळातही आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील." महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या माध्यमातून या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तावित क्रीडा संकुलामध्ये अत्याधुनिक इनडोअर हॉल, विविध क्रीडा प्रकारांसाठी मैदाने, व्यायामशाळा, योगा हॉल, स्वच्छतागृह तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे पारनेर तालुक्यातील युवकांना आधुनिक आणि दर्जेदार क्रीडा सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. क्रीडा संकुल उभारण्यास मंजूरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, क्रीडामंत्री व पालकमंत्री यांचे तालुक्यातील जनतेच्या वतीने खुप आभार!

आमदार दाते सर यांच्या प्रयत्नांना



अखेर यश मिळाल्याने तालुक्यातील युवक, क्रीडाप्रेमी आणि पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या क्रीडा संकुलाच्या उभारणीमुळे पारनेर तालुक्यातील युवकांना विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण घेण्यासाठी अत्याधुनिक सुविधा मिळणार आहेत. स्थानिक पातळीवर क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यासही चालना मिळणार असून ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याचा मार्ग अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे तालुक्यात क्रीडा संस्कृतीला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विजू पठारेकडून जीवघेणा हल्ला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील तोफखाना पोलीस स्टेशनच्या हद्दीत जुन्या वादातून गुंड विजू पठारे आणि त्याच्या साथीदारांनी एका तरुणावर तलवारी आणि कोयत्याने भीषण हल्ला केला. झेडपी कॉलनीतील पाण्याच्या टाकीजवळ घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी पाच जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुनिता भिवषण घोरपडे यांचा मुलगा अविनाश याला भांडण मिटवण्याच्या बहाण्याने बोलावून घेण्यात आले होते. तिथे विजू राजू पठारे याने कोयत्याने, तर अजय राजू पठारे याने तलवारीने अविनाशवर सपासप वार केले. सनी रणजीत चावरे याने लाकडी दांडक्याने मारहाण केली, ज्यामुळे अविनाश गंभीर जखमी होऊन खाली कोसळला. मुलाला वाचवण्यासाठी त्याचे वडील मध्ये पडले असता निलेश ससाणे याने त्यांना लोखंडी रॉडने मारून जखमी केले.

## ठाण्यात जात प्रमाणपत्रासाठी अडीच लाखांची लाच

- महिला अधिकाऱ्याला अटक

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

कोकण विभाग अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे ठाण्यातील चरई येथील कार्यालयात मिनाक्षी नारायण उन्हाळे (४६) या उपसंचालक (संशोधन), वर्ग-१ या पदावर कार्यरत आहेत. त्यांना अडीच लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. कोकण विभाग अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी ने समितीच्या उपसंचालक दर्जाच्या महिला अधिकाऱ्याला अडीच लाख रुपयांची लाच रुपयांची लाच घेताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीची फाईल क्लिअर करून देण्यासाठी ही लाच घेतल्याची बाब पोलीस




कारवाईतून समोर आली आहे. मिनाक्षी नारायण उन्हाळे (४६) या उपसंचालक (संशोधन), वर्ग-१ या पदावर कार्यरत आहेत. तक्रारदार यांनी पत्नी आणि मुलीचे अनुसूचित जमाती प्रमाणपत्रसाठी अर्ज केला होता. या अर्जाची पडताळणीची फाईल मंजूर करून देण्यासाठी उन्हाळे यांनी अडीच लाख रुपयांची लाच मागितली. प्रकरणी तक्रारदाराने १२ फेब्रुवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रायगड-अलिबाग कार्यालयाकडे तक्रार केली होती. त्यानंतर ही तक्रार वर्ग होताच, ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १३ फेब्रुवारी रोजी तक्रारीची पडताळणी केली, त्यात लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर १३ मार्च रोजी कार्यालयात सापळा रचला. त्यावेळी तक्रारदाराकडून २ लाख ५० हजार रुपयांची लाच आपल्या केबिनमध्ये स्वीकारताना मिनाक्षी उन्हाळे यांना पंचासमक्ष सायंकाळी ४.१० वाजता रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे व सुहास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.

## सुरज खळे याची "महाराष्ट्र कुमार श्री" स्पर्धेत निवड

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहरातील श्रीमंतयोगी जिम्नेशियम मधील सुरज खळे यांची महाराष्ट्र कुमार श्री स्पर्धेत निवड झाल्याने सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. दिवा शहरातील गणेशपाड्यात राहणारा सुरज खळे गेली एक वर्षापासून श्रीमंतयोगी जिममध्ये मेहनत घेत असून जिमचे प्रशिक्षक ओमकार सावंत आणि रवी शेजवळ यांचे सुरजला मोठं योगदान मिळाले आहे. मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील मालदोली बांद्रेवाडी हे सुरज शिवराम खळे यांच छोटंस गाव असून आपली मेहनत व जिद्दीच्या बळावर महाराष्ट्र कुमार श्री स्पर्धेत सूरजची निवड झाली आहे. व्यायामाची आवड असलेल्या सुरजला श्रीमंतयोगी जिम्नेशियमचे संचालक राहुल कानस्कर व संकेश भावे यांचे देखील वेळोवेळी योगदान



मिळाले असल्याचे सुरज खळे यांनी स्पष्ट केले आहे. मागील वर्षीच्या ठाणे जिल्हा ४५ वी अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेत सूरज यांनी तिसरा क्रमांक पटकावला होता. सुरज खळे यांची महाराष्ट्र कुमार श्री स्पर्धेत निवड झाल्याने दिवा शहरात सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील वाटचालीस अनेक शुभेच्छा देण्यात येत आहे.

## पुस्तकामुळेच माणूस घडतो - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

माणसांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याची ताकद पुस्तक वाचनात असते. कायदे किंवा नियमांच्या आधारे बदल घडवता येत नाहीत; ते स्वयंप्रेरणेनेच घडतात. त्यामुळे वाचनाची सवय प्रत्येकाने जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

नांदेड ग्रंथोत्सव 2025 च्या समारोप प्रसंगी (दि. 15 मार्च) ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अच्युत बन होते. व्यासपीठावर माजी जि.प. अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जिल्हा कोषागार अधिकारी विक्रम देशमुख, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी, ग्रंथालय अधिकारी अनिल



सूर्यवंशी, निरीक्षक प्रताप सूर्यवंशी, राजेंद्र हंबीरे, गोविंद वडगावकर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले की, मला लहानपणापासून वाचनाची सवय आहे. पुस्तकावर केलेली गुंतवणूक आयुष्यात खूप काही देऊन जाते. लेखक आपल्या लेखनातून एकाच वेळी हजारो लोकांशी संवाद साधतात. आपण सर्व भाषांतील पुस्तके वाचली पाहिजेत. मराठी भाषेला मोठा साहित्यिक वारसा लाभला आहे. मोबाईलच्या युगात वाचन करणे म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यासारखे आहे; मात्र हे आव्हान स्वीकारणे गरजेचे आहे. कामाच्या व्यापातूनही वाचनाची सवय कायम ठेवत असल्याचे सांगत त्यांनी सेतुमाधव पगडी लिखित आणि कै. नरहर कुरुंदकर यांच्या प्रस्तावनेचे 'छत्रपती शिवाजी' हे पुस्तक सध्या वाचत असल्याचे सांगितले. तसेच या कार्यक्रमाला शासकीय सोपस्कार म्हणून नव्हे तर एक वाचक व ग्रंथप्रेमी म्हणून उपस्थित असल्याचेही त्यांनी नमूद केले. वाचन चळवळ वाढवणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तके देऊन वाचनाची गोडी लावावी, असे मत व्यक्त केले. माजी जि.प. अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे यांनी ग्रंथालयीन कर्मचारी अत्यंत कमी मानधनावर काम करत असून त्यांचे मानधन वाढविण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच ग्रंथालय क्षेत्रातील अडचणी सोडविण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमात जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे व राजेंद्र हंबीरे यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष डॉ. अच्युत बन यांनी मराठी भाषेचा वापर वाढविण्याचे आवाहन करत 'बन साहित्य प्रतिष्ठान'च्या वतीने गेल्या पंचवीस वर्षांपासून साहित्यिक पुरस्कार देण्यात येत असल्याची माहिती दिली. वाचनाच्या आवडीमुळे जागतिक साहित्य संमेलन व इतर कार्यक्रमांसाठी आतापर्यंत ५५ देशांना भेट दिल्याचेही त्यांनी सांगितले. या वेळी ग्रंथोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्यांचा तसेच वाचकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोविंद फाजगे यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत तघडफल्ले यांनी केले, तर आभार जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी मानले.

# पारनेर शहरात फुलणार भक्तीचा मळा !

## भव्य मिरवणुक व महाराष्ट्रातील नामवंत शाहिरांच्या शाहिरीने कडाडणार ढोलकी, डफ तुणतुणे !

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

श्री.सत्य अविनाश पारखपद समाज पारनेर आयोजित ,सालाबाद प्रमाणे या ही वर्षी प.पु.सद्गुरू आत्मज्ञानी गणपत बाबा चौरे यांचे ज्येष्ठ नातू व सद्गुरु ब्रह्मनिष्ठ हरिदास महाराज चौरे यांचे चिरंजीव परमपूज्य सद्गुरु किसन बाबा चौरे यांचा २२ वा पुण्यतिथी सोहळा पारनेर जामगाव रोड येथील आत्मज्ञानी गणपत बाबा मठामध्ये

मंगळवार दि. १७/०३/२०२६ रोजी संपन्न होत आहे.सद्गुरु विचारांची देवाण-घेवाण होणाऱ्या पारनेर येथील या आत्मज्ञानी गणपत बाबा मठ या ठिकाणी सद्गुरु किसन बाबा चौरे यांचा पुण्यतिथी सोहळा भक्तिमय व मंगलमय




वातावरणात पार पडत आहे . प.पु. सद्गुरु किसन बाबा चौरे यांचे अध्यात्मिक अधिष्ठान हे वेगळ्या स्वरूपाचे होते.संसारिक जीवन जगत असताना गुरुज्ञानाचा अवलंब करून परमार्थिक सुख कशाप्रकारे अनुभवावे यासाठी सद्गुरुचा साधकाच्या जीवनात कशाप्रकारे लाभ होतो हे किसन बाबांनी आपल्या जीवनात दाखवून दिले आहे.आत्मज्ञानी गणपत बाबांच्या अध्यात्मिक कार्यात आपले आयुष्य घालवून योग साधनेतून आनंदी जीवन कसे जगावे त्या साठी जीवनात सद्गुरु पदाचे महत्त्व काय असते याची जाणीव आपल्या शिष्य मंडळांना पटवून दिली आहे.

समाजातील जातिभेद अंधश्रद्धा अनिष्ट चालीरीती मोडण्यासाठी त्यांनी आपल्या गुरुपदाचा वापर करून शिष्य गणांना परमार्थिक सुखाची प्राप्ती करून दिली. अहिल्यानगर जिल्ह्यसह कोल्हापूर ,सातारा , सांगली ,पुणे या सह महाराष्ट्रात विविध ठिकाणी शाहिरी बाण्यातून ढोलकी डफ तुनतुन्याच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन व समाज प्रबोधनपर कार्य करणारा सत्य अविनाश पारखपद समाज असून इतर जिल्ह्यातून हजारो भाविक भक्त हे पारनेर मध्ये या पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने एकत्र जमतात व पारनेरच्या बाजारपेठेतून सद्गुरु प्रतिमेची भव्य मिरवणूकीच्या माध्यमातून अध्यात्मिक भेदिक भजने व कलगी तुऱ्याचा सामना या लोककलेच्या माध्यमातून पारनेर शहरात पारनेरकरांना अनुभवयास मिळतो.व संपूर्ण पारनेर शहर हे भक्तीमय होऊन जाते.

या भक्ती सोहळ्यात दुपारी १२ ते ०३ पारखपदी सत्संग ,भेदीक गायन व भजन , ०३ ते ०६ पारनेर शहरातून महाराष्ट्रातील नामवंत शाहिरांचे गायन व शाहिरी जल्लोषात लेझीम व हलगीच्या निनादात सद्गुरू प्रतीमांची भव्य मिरवणूक निघणार असून,सायं. ०७ वा.सद्गुरू पादुकांची महापुजा व तद्नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे . तसेच रात्री ९ ते पहाटेपर्यंत नामवंत शाहीरांचा भेदिक भजनाचा कार्यक्रम होणार आहे.आत्मज्ञानी गणपत बाबा मठ,जामगाव रोड,पारनेर येथे सदर कार्यक्रमास उपस्थित राहून परमार्थिक सुखाचा लाभ घ्यावा,असे आवाहन प.पू. सद्गुरु बबनदादा चौरे व समस्त सत्य अविनाश पारख पद समाज पारनेर यांच्या कडून करण्यात येत आहे .

# एकादशी दिनी भाविकांची दर्शनास गर्दी

- श्रींचे गाभाऱ्यात पुष्प सजावट लक्षवेधी
- इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणीच्या आरती

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**



आळंदी येथील भागवत एकादशी ( पापमोचनी ) निमित्त माऊली मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रमांतुन मंदिरात एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. पन्नास हजारावर भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. एकादशी दिनी भाविकांनी मंदिर आणि नगरप्रदक्षिणा करीत हरिनाम गजरात श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावटीने श्रींचे रूप लक्षवेधी दिसत होते. इंद्रायणी नदी घाटावर महिलांसह भाविकांची इंद्रायणी आरतीस गर्दी झाली होती. इंद्रायणी आरे सेवा समिती, आळंदी देवस्थान - आळंदी नगरपरिषद, देहू आळंदी परिसर विकास समिती यांनी स्वतंत्र इंद्रायणी आरती करून स्थान माहात्म्य जोपासले. आळंदी मंदिरात भाविकांनी एकादशी दिनी गर्दी करीत रांगा लावून हरिनाम गजरात श्रींचे दर्शन घेतले. एकादशी दिनी श्रींचे मंदिरात पहाटे वेदमंत्र जयघोषात पवमान अभिषेक करण्यात आला. यावेळी आळंदी संस्थानचे विश्वस्त पदाधिकारी, व्यवस्थापक माऊली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने सरकार, सेवक, कर्मचारी, मानकरी, सुरक्षा रक्षक, पोलीस कर्मचारी यांनी नियोजन करीत भाविकांना कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शन सुलभ देण्यासाठी परिश्राम घेतले. आपापली काळजी घेऊन भाविकांनी मंदिर परिसरात रांगा लावल्या. दुपारचा फराळाचा महानैवेद्य, वारकरी शिक्षण संस्थेचे वतीने परंपरेने देहूकर यांचे तर्फे कीर्तन सेवा, रात्री आरती झाली. श्रींचे दर्शन, प्रदक्षिणा पूर्वी भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानास गर्दी केली. आळंदी मंदिरात भाविकांनी धुपारतीस गर्दी केली. मंदिरात परंपरेने धार्मिक उपचार श्रीची पूजा, आरती, फराळाचा महानैवेद्य आदी धार्मिक कार्यक्रम झाले.

# मराठी भाषा अस्मितेचा श्वास – प्रा. मा. मा. जाधव

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी शेकडो वर्षांचा इतिहास आणि शासनासोबत जवळपास अकरा वर्षे सातत्याने प्रयत्न करावे लागले. हा दर्जा उशिरा मिळाला असला तरी मराठी भाषेचा अभिमान बाळगणे व तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी भाषा ही आपल्या अस्मितेचा श्वास आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. मा. मा. जाधव यांनी केले. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नांदेड यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी (दि. १५ मार्च) आयोजित 'अभिजात मराठी भाषा व साहित्य' या परिसंवादाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. डॉ. जाधव पुढे म्हणाले की, अभिजात



भाषेचा दर्जा मिळणे म्हणजे हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव होय. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती समाजातील वेदना, संघर्ष आणि दु:ख व्यक्त करणारे प्रभावी माध्यम आहे. अशा प्रकारे समाजाशी जोडलेली भाषा कायम जिवंत राहते. या परिसंवादात वक्ते संजय जगताप यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यामागील ऐतिहासिक पुराव्यांचा उल्लेख केला. दोन हजार वर्षांपूर्वीचे शिलालेख, इ.स. ९३९ चे शिलालेख, ज्योतिष रत्नमाला या संस्कृत ग्रंथातील संदर्भ, आद्यकवी मुकुंदराज यांचा विवेकसिंधु, इ.स. १२७८ मधील महिम भट्ट यांचे लीळाचरित्र, तसेच ज्ञानेश्वरी आणि संत तुकाराम गाथा यांसारख्या साहित्यसंपदेच्या आधारे मराठीच्या प्राचीनतेचे व समृद्धतेचे पुरावे अधोरेखित झाले असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ साहित्यिक विलास वैद्य यांनी 'मराठीच बोला, संतांचा विचार घरोघरी' या कवितेद्वारे मराठी भाषेचा अभिमान आणि महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास नांदेडचे तहसीलदार विकास बिरादार व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी अ. वा. सूर्यवंशी यांनी केले.

# बिलोली नगरीत अवतरणार 'अयोध्या'

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

हिंदू धर्माच्या एकत्रीकरणाचे प्रतीक आणि श्रद्धेचे केंद्र असलेल्या 'श्रीराम जन्मोत्सवा'निमित्त यंदा बिलोली तालुक्यात भक्तीचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळणार आहे. श्री राम जन्मोत्सव समिती व सकल हिंदू समाज, बिलोली तालुका यांच्या वतीने यंदा भव्य शोभायात्रा आणि काशी येथील प्रसिद्ध कलाकारांद्वारे 'श्रीराम चरित्र रामायण रामलीले'चे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २९ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता बागेतील हनुमान मंदिरापासून 'श्री राम मंदिर' गंगा नगरपर्यंत निघणारी शोभायात्रा म्हणजे डोळ्यांचे पारणे फेडणारा सोहळा असेल प्रभू श्री रामांची आणि अंजनीपुत्र हनुमंताची विलोभनीय मूर्ती, अघोरी ग्रुपचे अंगावर शहारे आणणारे सादरीकरण आणि शिव-पार्वतीचा दैवी देखावा.

# कीर्तनकार 'महाराजा'चा अल्पवयीन मुलीवर अमानुष अत्याचार

- वारकरी संप्रदायाला काळिमा!
- वारकरी शिक्षण संस्थेच्या नावाखाली वासनेचा बाजार
- आरोपीच्या क्रूरतेचा कळस
- आरोपीला पारनेर पोलिसांकडून तात्काळ अटक

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

अध्यात्म आणि संस्काराचे धडे देणाऱ्या वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे उघडकीस आली आहे. श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आणि कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) याने एका १७ वर्षीय



अल्पवयीन मुलीवर मागील पाच वर्षांपासून धाक दाखवून वारंवार अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. पीडित मुलीला गरम लोखंडी पक्कडीने चटके देऊन अमानुष मारहाण केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी इयत्ता आठवीत असल्यापासून हा प्रकार सुरू होता. आरोपी यशवंत थोरात हा पीडितेच्या शेजारीच राहत असल्याने दोन्ही कुटुंबांचे घरोब्याचे संबंध होते. पीडितेचा भाऊ आरोपीच्याच वारकरी शिक्षण संस्थेत सचिव म्हणून कार्यरत आहे. याचाच फायदा घेऊन आरोपीने २०२१पासून पीडितेवर वाईट नजर ठेवली होती. मुलगी घरी एकटी असताना किंवा आरोपीच्या घरी कोणी नसताना त्याने वारंवार तिच्यावर बळजबरीने शरीरसंबंध प्रस्थापित केले. पीडितेने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने तिला जीवे मारण्याची धमकी दिली होती. मी दोन हाफ मर्डर केलेले आहेत, जर कोणाला काही सांगितले तर तुझ्या आई-वडिलांना आणि भावाला मारून टाकीन, अशी भीती तो घालत होता. कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी पीडितेने हा छळ मुकाट्याने सहन केला. घटनेचा थरार १० मार्च २०२६ रोजी शिगेला पोहोचला. आरोपीने पीडितेला फोन करून त्याच्या घरी बोलावले. तिने येण्यास नकार दिला असता, त्याने कुटुंबाला संपवण्याची धमकी दिली. भीतीपोटी पीडिता त्याच्या घरी गेली असता, आरोपीने तिला कॉम्प्युटर रूममध्ये नेऊन बांबूने व चापटीने बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, नराधम आरोपीने स्वयंपाकाची लोखंडी पक्कड गॅसवर गरम करून पीडितेच्या चटके दिले. या अमानुष कृत्यानंतरही त्याने तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. मारहाण आणि चटक्यांमुळे पीडितेला चालणेही कठीण झाले होते. १४ मार्च रोजी तिचा भाऊ घरी आला असता, तिला गंभीर अवस्थेत पाहून त्याने विश्वासात घेतले. मावस भावांच्या उपस्थितीत पीडितेने आपल्यावर झालेला पाच वर्षांचा अन्याय कथन केला. त्यानंतर पीडितेच्या भावाने पारनेर पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. पारनेर पोलिसांनी याप्रकरणी यशवंत एकनाथ थोरात विरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (POCSO) च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# सख्या भावजयीवर कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील धामणी या ठिकाणी सख्या भावजयीवर कोयत्याने वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न,आधी दिराने दिली होती धमकी... घराच्या जागेच्या वादावरून सख्या दिरानेच भावजयीवर सपासप कोयत्याने वार करून भावजयीवर प्राणघातक हल्ला चढविला यामध्ये नंदा तानाजी सोनवणे वय (60 वर्ष) या जखमी झाल्या असून सुरेश धोंडीबा सोनवणे मुळगाव धामणी सध्या राहणार केडगाव चौफुला तालुका दौंड याला आज रविवारी पोलिसांनी ताब्यात घेत ले. पारगाव कारखाना पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काल शनिवारी संध्याकाळी ६ ते रात्री ८ वाजण्याच्या सुमारास नंदा तानाजी सोनवणे घरी असताना त्यांचा दीर सुरेश सोनवणे हा दारु पिवुन येवुन त्यांना शिवीगाळ करून तुमचा एक एकाचा मर्डर



करतो अशी धमकी दिली व तेथुन निघुन गेला त्यानंतर गावातील जिल्हा परिषद शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमासाठी नंदा तानाजी सोनवणे व त्यांचा मुलगा संपत सोनवणे, सुन शीतल संपत सोनवणे , पुजा बाबुराव सोनवणे गेले होते. कार्यक्रम चालु असताना रात्री आठ वाजण्याच्या सुमारास नंदा सोनवणे या कार्यक्रमाच्या ठिकाणावरुन जात असताना शिवशंकर दुध डेअरीच्या समोर अचानक सुरेश सोनवणे हा हातात कोयता घेवुन नंदा सोनवणे यांच्यावर धावून आला व तुला आत्ता जिवंत सोडत नाही. तुझा मर्डर च करतो असे म्हणून जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याने त्यांच्या डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी दोन्ही हात बचावासाठी पुढे केले असता त्यांच्या दोन्ही हातावर कोयत्याने वार केले दोन्ही हातावर गंभीर दुखापत होवुन दोन्ही हात फ्रॅक्चर झाले नंदा सोनवणे सदर ठिकाणावरून जीव वाचविण्यासाठी पळण्याचा प्रयत्न केला असता त्याने पाठीमागुन कोयत्याने पाठीवर उजवे बाजुस वार करून गंभीर दुखापत केली. त्यांनी आरडाओरडा केला असता मुलगा संपत सुन पुजा व शितल तेथे आले असता सुरेश सोनवणे याने शिवीगाळ करत तुमचा एकएकाचा मर्डर करतो अशी धमकी देवुन कोयता घेवुन पळून गेला. नंदा सोनवणे यांच्यावर पारगाव येथील खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी मंचर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे करत आहे. सध्या ग्रामीण भागामध्ये उन्हाळ्याचे दिवस असल्याने बहुतांशी वर्ग हा शेतकरी आहे तरी शेतीची कामे कमी प्रमाणात आहेत म्हणून फावला वेळ जास्त आहे आणि म्हणून जुनी भांडण उकरून या मोकळ्या वेळेमध्ये जागेवरून भावकी मध्ये जमिनीच्या वादातून खूप भांडणांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

# सरकारी व खाजगी शाळा सकाळच्या सत्रात सुरू कराव्यात

**पाथर्डी: (समर्थ गांवकरी)**

उन्हाची तीव्रता वाढत असल्याने खाजगी व सरकारी शाळांचे वेळापत्रक बदल करणे गरजेचे आहे.मार्च महिना सुरू असल्याने उन खूप वाढत आहे .सध्या शहरात व तालुक्यात जवळपास सर्व शाळा बारा ते पाच अशा वेळेत असल्याने मुले आजारी पडत आहेत, त्यामुळे शिक्षण विभागांनी लवकरात लवकर शाळेचे वेळापत्रक सकाळच्या वेळेत करावे, अशी मागणी पालकांकडून होत आहे. उन्हामुळे शाळांतील उपस्थिती घटत आहे. दुपारची वेळ असल्याने मुलांना चक्कर येणे ,ताप येणे असे आजार वाढत चालले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात मुलांचे वार्षिक परीक्षा असल्याने मुले आजारी पडल्यास परीक्षा वर त्याचा परिणाम होऊ शकतो.

# नांदेड जिल्ह्यात ६ हजार १९९ प्रकरणे निकाली

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये नरेंद्र के. ब्रह्मे, प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नरेंद्र के.ब्रह्मे यांच्या अध्यक्षतेखाली दि १४मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये मोटार अपघात नुकसान भरपाईची प्रकरणे, दिवाणी व फौजदारी तडजोड पात्र प्रकरणे, कौटुंबिक वाद प्रकरणे, एन.आय. ॲक्टची प्रकरणे, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका वाद पुर्व मालमत्ता कराची प्रकरणे, गुन्हा कबुलीची प्रकरणे, आर.टी.ओ. व रेल्वे पोलीस विभागाची प्रकरणे, कौटुंबिक, कामगार, सहकार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच प्रकरणे, सर्व बँक प्रकरणे, फायनान्स कंपनीची प्रकरणे, पंचायत समिती कर वसुली व दाखलपुर्व प्रकरणे, बि.एस.एन.एल. कंपनी प्रकरणे, एम.एस.ई.डी.सी.एल. कंपनी ईत्यादी प्रकरणे ठेवण्यात आली होती त्या करीता जिल्ह्यात एकुण ३३ पॅनल तयार करण्यात आले होते. दि १४ मार्च २०२६ रोजी झालेल्या लोक न्यायालयात नांदेड जिल्ह्यातील न्यायालयातील प्रलंबित एकूण १२६२९ प्रकरणे ठेवण्यात आली होती, त्यापैकी ११३५ प्रकरणे निकाली व जवळपास २९८१८४५०२ रुपयांचे तडजोड मुल्य होते. मालमत्ता थकबाकी व पाणीपट्टीची ४५२८ प्रकरणे निकाली निघाली व ४५६३८३८३ रूपयांचे तडजोड मुल्य होते. असे एकूण ६१९९ प्रकरणे निकाली निघाली आणि तडजोड मुल्य ३८०४६०७५९ रूपये एवढे आहे. विषेश म्हणजे १४ कोटींचे मुख्य दिवाणी प्रकरण आणि एम.ए.सी. टी.चे १०३ प्रकरणे या राष्ट्रीय लोकअदातीमध्ये निकाली निघाली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद जी. देशपांडे यांनी राष्ट्रीय लोकअदालतीसाठी सहभागी झालेल्या सर्व पक्षकार, न्यायाधीश वर्ग, कर्मचारी वर्ग त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

# माजी विद्यार्थी संघ समितीची स्थापना

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

येथील श्री तिलोक जैन विद्यालयात माजी विद्यार्थी संघ समितीची स्थापना अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या प्रसंगी विद्यालयाचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी यांनी माजी विद्यार्थी संघ स्थापनेचे महत्त्व स्पष्ट करताना माजी विद्यार्थ्यांचे अनुभव, मार्गदर्शन व सहकार्य यामुळे विद्यालयाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल असे मत व्यक्त केले. समिती प्रमुख सुनिल कटारिया व आतिश भावसार यांनी सर्वांचे स्वागत केले या नंतर सर्वानुमते माजी विद्यार्थी संघ समितीची निवड प्रक्रिया पूर्ण करून समितीची घोषणा करण्यात आली. सदर समिती मध्ये निवडण्यात आलेली कार्यकारीणी पुढीलप्रमाणे :महेश बाहेती - अध्यक्ष , अभय गांधी - उपाध्यक्ष ,अजय भंडारी - सचिव, गणेश पैठणकर- खजिनदार ,अमोल कांकरिया - प्रसिद्धी प्रमुख ,अनिल खाटेर - प्रसिद्धी प्रमुख , मा.गणेश मरकड,डॉ.ऋषिकेश कुलकर्णी, सुनिल कटारिया, आतिश भावसार ,डॉ.अनिल पानखडे ,अमोल उरणकर , गौतम गुगळे , महेश सानप , निलेश खाबिया ,राहुल दरंदले ,जब्बार पठाण , संदीप लोखंडे - सदस्य व विद्यालयातील माजी सेवानिवृत्त शिक्षिका साधना रेदासनी यांची तज्ञ मार्गदर्शक म्हणून निवड करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचीत अध्यक्ष महेश बाहेती उपाध्यक्ष अभय गांधी , प्रसिद्धी प्रमुख अमोल कांकरिया व खजिनदार गणेश पैठणकर यांनी देखील आपले विचार स्पष्ट केले .या सर्वांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करत संघ समितीमध्ये स्थान देऊन कार्य करण्याची जी संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

# वाचनाने महत्त्वकांक्षा निर्माण होते : प्रा. एस झेड देशमुख

## गुणवंतांचा सन्मान हा प्रेरणादायी व प्रोत्साहन देणारा

**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

वाचनाने महत्त्वकांक्षा निर्माण यूपीएससी एमपीएससी या स्पर्धा परीक्षा करत परीक्षेचा अभ्यास म्हणजे अंधारातील उडी आहे या परीक्षेचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी आपल्याजवळ दुसरा प्लॅन असायला हवा असायला हवा नाहीतर विद्यार्थी वैफल्यग्रस्त होतात असे प्रतिपादन शिवचरित्रकार एस झेड देशमुख यांनी केले. गणोरे ( ता. अकोले ) येथील लोकमान्य ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने अकोले तालुक्यातील यूपीएससी एमपीएससी परीक्षेत व आपापल्या क्षेत्रात यश मिळवलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्यात देशमुख बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष किसन आप्पा सर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पोलीस निरीक्षक नारायण गाबाजी उगले होते यावेळी लोकमान्य पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष किसन आंबरे, उपाध्यक्ष अशोक रामभाऊ आंबरे संचालक अशोक किसन आंबरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस, संपादक समर्थ गावकरी डॉ.विश्वासराव आरोटे विवेकानंद पतसंस्थेचे माजी अध्यक्ष राजारामबापू अस्वले विधीतज्ञ उमेश आवारी विरगाव सोसायटीचे अध्यक्ष सुनील बापू वाकचौरे ,दादापाटील वाकचौरे, विजय वाघ,बाळासाहेब मुळे, शांताराम आंबरे अलका आंबरे,बाळासाहेब आंबरे, सिमा आंबरे,सुधाकर तोरकड, संस्थेची संचालक आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

निलेश निलेश शांताराम आंबरे- पोलीस उपनिरीक्षक, अविनाश बाळासाहेब आंबरे पोलीस आप निरीक्षक, रोहित बच्छाव अंबरे चार्टर अकाउंट, महेश शांताराम मुखेकर स्टेट बँक जुनिअर असोसिएट, मार्तंड कचरू भरीतकर सेंट्रल बँक असोसिएट, संदीप ज्ञानेश्वर आंबरे आय आय टी इंदोर, भाऊसाहेब आनंदा सदगीर युवा कुस्तीपटू, राजवीर उमेश आवारी गोल्ड मेडल एरोबिक्स रशिया, नारायण रामदास गबाले एम एस डब्ल्यू पीएचडी, डॉ प्रथमेश संजय केदार बीडीएस, प्रफुल अशोक खताळ एक्झिट इंजिनिअर ऑल




इंडिया, शंतनु ज्ञानेश्वर खुळे-नाबाड बँक, इंडियन आर्मी निवड झाले यांचे आई-वडील, वैष्णवी विजय कवडे सी एस आर आय नेट परीक्षा चे वडील प्राध्यापक विजय कवडे सर, आकांक्षा सुधाकर तोडकर स्टेट बँक ज्युनिअर असोसिएट मोनाली विजय आहेर चे नातेवाईक आर्टिकल्चर मॅनेजर, आदिती जगन्नाथ आहेर-नामांकित कन्स्ट्रक्शन कंपनी जपान या गुणवंताना यावेळी सन्मानित करण्यात आले. यावेळी स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या यशवंतांनी आपल्या खडतर प्रवासाची यशोगाथा मनोगत व्यक्त केली. ही यशोगाथा विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी ठरणार आहे.

सुत्रसंचालन अक्षय बोंबले यांनी केले, शेवटी प्राध्यापक अशोक खताळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी गणोरे पंचक्रोशीतील ग्रामस्थ व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते